

गृहनिर्माण आणि शहरी गरीबी निर्मुलन मंत्रालय, भारत सरकार

पुरस्कृत

**प्रधानमंत्री आवास योजना**

**सर्वांसाठी घरे (शहरी)**

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

सत्यमेव जयते



**आमचं स्वप्न साकारतंय, आमचं स्वत:च घर होतंय !**

# टप्पा-१ सर्वांसाठी घरे शहर कृती आराखडा तयार करणे अंतर्गत मागणी सर्व्हेक्षण ऑनलाईन रजिस्ट्रेशन सुरु करण्यात येत आहे

केंद्रशासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना "सर्वांसाठी घरे (शहरी)" सोलापूर महानगरपालिका राबवीत असून ही योजना झोपडपट्टीमधील लाभार्थी व झोपडपट्टी बाहेरील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटातील पात्र लाभार्थ्यांकरीता आहे.

**सोलापूर शहर सर्वांसाठी घरे कृती आराखडा तयार करण्याचे व तदनुषंगिक सर्व्हेक्षणाचे काम एनव्हायरोसेफ कन्सल्टंट्स, सोलापूर यांना देण्यात आले असून सोलापूर महानगरपालिकेकडून स्वतंत्र शहर तांत्रिक कक्ष सुद्धा स्थापन करण्यात आलेले आहे.**

## योजनेचा कालावधी

टप्पा क्र. १ सदर टप्प्यात सर्वांसाठी घरे कृती आराखडा, क्षमता बांधणी व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे.

टप्पा क्र. २ सविस्तर प्रकल्प अहवालानुसार प्राधान्य क्रमानुसार पात्र लाभार्थ्यास घर देणे.

- **झोपडपट्टी वासियांकरीता घटक क्र. १:-** जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करून त्यावरील झोपडपट्ट्यांचा "आहे तेथेच" पुनर्विकास करणे व बाधित क्षेत्रावरील झोपडपट्ट्यांचे योग्य ठिकाणी पुनर्वसन करणे.
- **झोपडपट्टी बाहेरील ज्यांचे स्वत:चे प्लॉट आहेत अशा पात्र लाभार्थ्यांकरीता घटक क्र. २:-** कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (३ लाखांपर्यंत वार्षिक उत्पन्न), अल्प उत्पन्न घटक (३ ते ६ लाखांपर्यंत वार्षिक उत्पन्न), मध्यम उत्पन्न घटक-१ (६ ते १२ लाखांपर्यंत वार्षिक उत्पन्न) मध्यम उत्पन्न घटक-२ (१२ ते १८ लाखांपर्यंत वार्षिक उत्पन्न) यांचेकरिता परवडणाऱ्या घरांकरीता व्याज अनुदान **व घटक क्र. ४:-** आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांतील लाभार्थ्यांद्वारे वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधण्यास अनुदान.
- **झोपडपट्टी बाहेरील ज्यांचे स्वत:चे प्लॉट नाहीत अशा पात्र लाभार्थ्यांकरीता घटक क्र. ३:-** खाजगी व सरकारी (निमशासकीय संस्था धरून) यांच्या सहभागाने राबविल्या जाणाऱ्या, परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पामध्ये (ज्यात किमान २५० घरकुले असणे आवश्यक असून यातील किमान ३५% घरे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आरक्षित असतील) अशा घरकुल योजनेतून पात्र लाभार्थ्यांना लाभ घेता येईल

## जाहीर आवाहन

सोलापूर शहरातील झोपडपट्टीवासिय व आर्थिक दुर्बल घटक, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न घटक-१ व २ यांच्या आपल्या स्वत:च्या हक्काच्या घरासाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत www.pmaysolapur.org या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी व अंमलबजावणीत उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन महानगरपालिकेस सहकार्य करावे.

सौ. शोभा बनशेट्टी
मा. महापौर
सो.म.पा.

**सर्व सन्माननीय पदाधिकारी व सदस्य**
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

डॉ. राजेन्द्र भोसले
मा. जिल्हाधिकारी तथा प्र. आयुक्त
सो.म.पा.

**● अधिक माहितीसाठी संपर्क ●**

| प्रधानमंत्री आवास योजना, सल्लागार कार्यालय, तळघर कौन्सिल हॉल, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर. संपर्क: ७८७५७५८०७९, ७८७५७५८०८१ सल्लागार संस्था: एनव्हायरोसेफ कन्सल्टंट्स, सोलापूर | प्रधानमंत्री आवास योजना, शहर तांत्रिक कक्ष, तळघर कौन्सिल हॉल, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर. संपर्क: ९४२३९८९९०२, ९४२२४५८१०० |
|---|---|